# वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुप्फुसाची समस्या

आरोग्य वार्ता

**वॉशिंग्टन :** प्रदूषित हवेत सतत राहिल्याने आरोग्यावर अनेक प्रकारे परिणाम होतो. हिवाळ्यात वायू प्रदूषण वाढल्याने फुप्फुसाचा त्रास होणाऱ्या लोकांची समस्या वाढते. फुप्फुस शरीरातील सर्वात सक्रिय, महत्त्वाच्या आणि नाजूक अवयवांपैकी एक आहे. हृदयापेक्षा जास्त मृत्यू फुप्फुसांशी संबंधित आजारांमुळे होतात.

भारतातील मृत्यूच्या दहा प्रमुख कारणांपैकी चार फुप्फुस आणि श्वसनाच्या आजारांशी संबंधित आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे या समस्येची तीव्रता वाढत आहे. 'द बीएमजे'मध्ये प्रकाशित झालेल्या अमेरिकन अभ्यासांनुसार, सूक्ष्म कण (पीएम २.५) वायू प्रदूषणाच्या अल्प आणि दीर्घकालीन परिणामामुळे हृदय आणि फुप्फुसाच्या आजारामुळे रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येते. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) २०२१ मध्ये हवेच्या गुणवत्तेची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आणि शिफारस केली की, वार्षिक सरासरी पीएम २.५ पातळी ५ एमजी/एम३ पेक्षा जास्त नसावी आणि २४ तास सरासरी पीएम २.५ पातळी १५ पेक्षा जास्त नसावी. अन्यथा ही पातळी आरोग्यासाठी धोकादायक आहे.

फुप्फुसाच्या ४० टक्के आजारांना वायू प्रदूषण कारणीभूत असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. संशोधनानुसार, वायू प्रदूषणामुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी असंसर्गजन्य रोगांचा धोका वाढतो.




100% Ayurvedic FDA APPROVED
Tanvi HERBALS
WHEATGRASSO
PURE WHEATGRASS EXTRACT TABLETS
Better Immunity . Better Energy . Better Digestion
60 Vegetarian Tablets | Health Supplement
FOOD SUPPLEMENT
गहू रोप रस सत्व टॉनिक
व्हिटाग्रासो
टॅबलेट्स (फूड प्रॉडक्ट)
BUY ONLINE
www.tanviherbals.com
फ्री फोन सल्ला : डॉ. मानसी : 9137231554 | फ्री व्हाट्सअप सल्ला 9820075812 | महाराष्ट्रातील फ्री चेकअप : 9820075813

# पालघर जिल्ह्यात २९४९ क्षयरुग्ण

## वर्षभरात ५४ जणांचा मृत्यू

**दिपाली चुटके लोकसत्ता**

**पालघर :** पालघर जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ५४ क्षयरुग्णांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत २९४९ क्षयरुग्ण उपचार घेत आहेत. विशेष म्हणजे १५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी दरम्यान राबवण्यात आलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेत १९७४ संशयित रुग्ण आढळले आहेत. यात डहाणू तालुक्यात ५५६ तर पालघर तालुक्यात ५४९ ही रुग्णसंख्या अधिक आहे. रोगाच्या नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे.

जिल्ह्यात तपासण्यात आलेल्या ७७ हजार रुग्णांपैकी सुमारे ३४ हजार रुग्णांची क्षय रोगासाठी तपासणी करण्यात आली होती. यापैकी प्राथमिक तपासणीमध्ये १९७४ रुग्णांची विस्तृत तपासणी सुरू असून १४० रुग्णांवर उपचार सुरू करण्यात आले आहेत. यापूर्वी जिल्ह्यात ४९ रूग्णांना औषधाला प्रतिरोधक (ड्रग रेजिस्टंट) व औषधाला प्रतिसाद देणाऱ्या (ड्रग सेन्सिटिव्ह) २९०० रुग्णांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे.

सन २०३० पर्यंत क्षयरोग निर्मूलन करण्याच्या दृष्टीने गावागावांमध्ये क्षयरोगमुक्त पंचायत हा उपक्रम राबवला जात आहे. थुंकी परीक्षण व क्ष-किरण तपासणी करण्यात येत आहे. मात्र लक्षणे आढळणारे संशयित रुग्ण क्षयरोगाची तपासणी करण्यास पुढाकार घेत नसल्यामुळे क्षयरोग आटोक्यात आणणे त्रासदायक होत आहे. सहा महिने पूर्णपणे औषधोपचार केल्यास हा आजार नियंत्रणात येऊ शकतो. मात्र काही रुग्ण तात्पुरते बरे वाटल्यास औषधोपचार घेण्याचे टाळतात. फक्त दोन टक्के क्षयरोग रुग्ण औषधोपचार घेतात त्यामुळे काही काळाने हा आजार पुन्हा डोकेवर काढतो आणि औषधाला जुमानत नाही. अशावेळी रुग्णाला आटोक्यात आणणे कठीण होते व मृत्यूचा धोका अधिक असतो.

शासनाच्या निक्षय पोषण आहार योजनेतून दरमहा ५०० रुपयांचे अनुदान क्षय रुग्णांना सकस आहारासाठी देण्यात येते. त्या जोडीने अतिरिक्त ५०० रुपयांचे अनुदान देण्याच्या दृष्टीने निक्षय मित्र अशी दात्यांची योजनादेखील सुरू केली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयामध्ये क्षयरोगाची नियमित तपासणी केली जाते. शहरी भागात वेगवेगळ्या तपासणी करिता ५२ ठिकाणी नियुक्त मायक्रोस्कोपी केंद्र (डीएमसी), २० ठिकाणी ट्रूनॅट केंद्र तर दोन ठिकाणी कार्ट्रिज न्यूक्लिक ॲसिड प्रवर्धन चाचणी (सीबीनाट) केंद्र उभारण्यात आले आहेत. सर्व ग्रामीण रुग्णालयांमध्ये प्रत्येक सोमवारी क्ष-किरण तपासणी उपलब्ध आहे.

# तापमानवाढीमुळे विजेच्या मागणीत वाढ

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्यातील काही भागात तापमान वाढू लागल्याने वातानुकूलित यंत्र, पंखे, कुलरसह कृषीपंपाचा वापर वाढू लागला आहे. त्यामुळे राज्यातील विजेची मागणी वाढून गुरुवारी (२२ फेब्रुवारी) दुपारी २.२० वाजता २६ हजार ७ मेगावॉटवर पोहचली आहे. त्यापैकी २१ हजार ४५३ मेगावॉट मागणी महावितरणची आहे.



राज्यात गेल्या महिन्यात तापमान कमी असल्याने विजेची मागणी २५ हजार मेगावॉटच्या जवळपास होती. त्यात महावितरणच्या २० हजार मेगावॉट मागणीचा समावेश होता. परंतु, राज्यातील काही भागात आता हळूहळू तापनान वाढत आहे. त्यामुळे विदर्भासह राज्यातील अनेक काही भागात एकीकडे वातानुकूलित यंत्र, पंखे यासह विद्युत उपकरणे, कृषीपंपासह कुलरही सुरू होऊ लागले आहे. त्यामुळे विजेची मागणी वाढली आहे. गुरुवारी (२२ फेब्रुवारी) दुपारी २.२० वाजता राज्यात विजेची मागणी २६ हजार ७ मेगावॉट होती. त्यापैकी २ हजार ८९५ मेगावॉट विजेची मागणी मुंबईची तर २१ हजार ४५३ मेगावॉट विजेची मागणी महावितरणची होती.

## सर्वाधिक वीजनिर्मिती महानिर्मितीकडून

**राज्यात बुधवारी दुपारी २.२० वाजता ६ हजार ३३३ मेगावॉट वीजनिर्मिती महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत प्रकल्पातून होत होती. महानिर्मितीच्या उरन गॅस प्रकल्पातून २७८ मेगावॉट, जलविद्युतमधून ७७ मेगावॉट, सौरऊर्जामधून ८७ मेगावॉट वीजनिर्मिती होत होती. तर खासगी प्रकल्पांपैकी जिंदलमधून ८६० मेगावॉट, अदानी १,८२० मेगावॉट, आयडियल १५३ मेगावॉट, रतन इंडिया १,३०४ मेगावॉट, एसडब्लूपीजीएलमधून ४५९ मेगावॉट वीजनिर्मिती होत होती. तर केंद्राच्या वाट्यातून राज्याला ८,४२१ मेगावॉट वीज मिळत होती.**

> राज्यात तापमानवाढीमुळे विजेची मागणी वाढत असली तरी महावितरणने आवश्यक नियोजन केल्याने सर्वत्र वीजपुरवठा सुरळीत आहे.
> – भारत पवार, मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई.

# मराठवाडा, विदर्भावर पुन्हा अवकाळीचे ढग

## शनिवारपासून पाच दिवस पावसाचा अंदाज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विदर्भ आणि मराठवाड्यावर पुन्हा अवकाळीचे ढग जमा झाले आहेत. शनिवारपासून पुढील पाच दिवस विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या एक पश्चिमी विक्षोप (थंड हवेचा झंझावात) हिमालयीन परिसरात सक्रिय आहे. शनिवारी, २४ फेब्रुवारीला आणखी एक पश्चिम विक्षोप सक्रिय होण्याचा अंदाज आहे.

### किमान तापमानात घट शक्य

**उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेचा परिणाम म्हणून पुढील तीन दिवस नाशिक, नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत पहाटेच्या किमान तापमानात काहीशी घट होण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. माणिकराव खुळे यांनी दिली आहे.**

दरम्यान, एक कमी दाबाची रेषा मराठवाड्यापासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत सक्रिय आहे. या हवामानविषयक स्थितीचा परिणाम म्हणून मराठवाड्यात रविवार, २५ फेब्रुवारी ते मंगळवार, २७ फेब्रुवारी दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. विदर्भात पावसाचा काहीसा जोर राहण्याचा अंदाज आहे. शनिवारपासून पुढील पाच दिवस हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. रविवार आणि सोमवारी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

# चटणी-भाकरी सामान्यांच्या आवाक्यात !

## ज्वारी क्विंटलला अडीच हजार तर मिरची किलोला दोनशे रुपयांनी स्वस्त

**दिगंबर शिंदे, लोकसत्ता**

**सांगली :** नवीन हंगामातील पीक येताच बाजारातील शाळूचे (ज्वारी) दर क्विंटलमागे अडीच हजार रुपयांनी घसरले असून, मिरचीचे दरही गेल्यावर्षीच्या तुलनेत किलोला दीडशे ते दोनशे रुपयांनी घसरले आहेत. यामुळे चटणी-भाकर सध्या तरी सामान्यांच्या आवाक्यात आहे. ज्वारी आणि मिरचीची बाजारातील आवक वाढल्यामुळे हे दर उतरल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे.

ऐन दिवाळीमध्ये व नोव्हेंबर अखेरीस अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने रब्बी हंगामातील शाळू पीक वाया जाण्याची भीती व्यक्त होत होती. तसेच गेल्या हंगामातील शाळूचीदेखील बाजारात टंचाई जाणवत होती. यामुळे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये शाळूचे ठोक बाजारातील दर क्विंटलला साडेसात हजारांवर गेले होते. तर किरकोळ बाजारात ज्वारीचे दर किलोला ८५ ते ९० रुपयांपर्यंत कडाडले होते. यामुळे गरिबाच्या ताटातील भाकरी महाग झाली होती.



मात्र, या महिन्याच्या मध्यापासून नवीन हंगामातील शाळू काढणी सुरू झाली आहे. नवीन मालाची मोठ्या प्रमाणात आवक होण्याची शक्यता दिसताच गेल्या आठवड्यापासून शाळूचे दर उतरले आहेत. सांगली बाजारात गेल्या आठवड्याच्या अखेरीस किमान दर ३ हजार २५० तर कमाल दर ५ हजार होता. तर सरासरी दर ४ हजार १२५ रुपये होता. मात्र, यामध्ये रोज चढउतार होत असल्याचे बाजार समितीचे सभापती सुजयनाना शिंदे यांनी सांगितले. तर संकरित ज्वारीचे सरासरी दर ३ हजार २४० रुपये प्रति क्विंटल आहेत.

> नव्या ज्वारीची आवक वाढल्यामुळे बाजारात शाळूचे दर उतरले आहेत. मात्र, ही आवक स्थिर होताच मार्च अखेरीस हे दर काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर हे दर स्थिर राहतील.
> – विवेक शेटे, पद्मावती ट्रेडर्स, सांगली.



दरम्यान, उन्हाळा सुरू होण्यापूर्वी महिला वर्गाची मसाला चटणी बनविण्यासाठी धांदल उडाली असून सांगली बाजारात यंदा मिरचीचे दरही आवाक्यात आहेत. गेल्या वर्षी सहाशे ते साडेसहाशे रुपये किलो असा दर असलेली ब्याडगी मिरची यंदा साडेचारशे ते पाचशे रुपये किलो दराने मिळत असल्याचे मिरचीचे व्यापारी सुनील पट्टणशेट्टी यांनी सांगितले. तर देशी मिरचीचे ठोक विक्रीचे प्रतिकिलो दर १६० ते १९० रुपये आहेत. संकेश्वरी, ब्याडगी, देशी, लवंगी या मिरचीची सध्या सांगली बाजारात आवक होत आहे.

**निडो होम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)**
**नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग 'बी', कोहिनूर सिटी मॉल, किरोल रोड, कुर्ला (प), मुंबई-४०० ०७०.**
**शाखा कार्यालय पत्ता : ऑफिस नं. ४०७-४१०, ४था मजला, काकडे-बिझ्झ आयकॉन, सीटीसी २६८७बी, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६, महाराष्ट्र.**
nido HOME FINANCE

**ई-लिलाव - ३० दिवसीय सांविधिक विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.
आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री कर्ज देणींच्या वसुलीपर्यंत जोडलेल्या तालिकेत नमूद केल्यानुसार रकमेच्या वसुलीकरिता **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. उक्त मालमत्ता **निडो होम फायनान्स लिमिटेड**कडे **(पूर्वीची एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)** ऋणको, सह-ऋणको व हमीदाराद्वारा लाभ घेतलेल्या कर्जाकरिता गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोंनी याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | ऋणको/ सह-ऋणको/ हमीदाराचे नाव | वसुलीची रक्कम | राखीव किंमत व इरठे | लिलावाची तारीख व वेळ | पाहणीची तारीख व वेळ | सांकेतिक ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल जगदीश साबळे (ऋणको), अश्विनी अमोल साबळे (सह-ऋणको) | रु. १३,२५,३५५.१४/- (रुपये तेरा लाख पंचवीस हजार तीनशे पंचावन्न व पैसे चौदा फक्त) २१.०२.२०२४ रोजीप्रमाणे + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - एलएएन नं.- एलएनएसकेएसटीएच०००००४५६९१ | रु. १६,९८,०००/- (रुपये सोळा लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) इसारा रक्कम ठेव रु. १,६९,८००/- (रुपये एक लाख एकोणसत्तर हजार आठशे फक्त) | २९.०३.२०२४ - स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह) | २९.०२.२०२४ स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान | २३.०१.२०२४ |

**सुरक्षित मत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- धारण केलेला फ्लॅट नं. ६०१, 'ए' विंग, सहाव्या मजल्यावरील, असलेला एकूण एरिया मोजमापाचा ४०.८९ चौ.मी. म्हणजेच ४४०.०० चौ.फू. कार्पेट, 'रिव्हराइन नेस्ट' म्हणून ज्ञात असलेली बिल्डिंग (पूर्वीची 'भावी होम्स' म्हणून ज्ञात असलेली) अपार्टमेन्ट येथे स्थित- धारण केलेला सर्व्हे नं. ८५/१६, जमीन एरिया मोजमापाचा ५५ आर म्हणजेच ५५०० चौ.मी., २३.९२ चौ.मी. रुंद रोडसह (त्यापैकी विकासाकरिता दिलेला एरिया ४४२०.०० चौ.मी. वगळता) उर्वरित 'ए' विंग १०८०.०० चौ.मी. आहे व येथे स्थित- व्हिलेज दसक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत. **उक्त मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित आहे : पूर्व :** मार्जिनल स्पेस, **पश्चिम :** फ्लॅट नं. ६०२, **दक्षिण :** कॉमन डक्ट व 'बी' विंग, **उत्तर :** स्टेअरकेस.

**नोंदी :** १) लिलाव विक्रीचे आयोजन **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटद्वारा ऑनलाइन करण्यात येणार आहे आणि ज्या बोलीदारांकडे वैध ई-मेल, आयडी पुरावा व फोटो पुरावा, पॅन कार्ड आहे आणि ज्यांनी डिमाण्ड ड्राफ्ट/ एनईएफटी/ आरटीजीएसद्वारा इरठेचे यथोचितरीत्या प्रदान केलेले आहे तेच केवळ या ''ऑनलाइन ई-लिलावा''त सहभागी होण्यास पात्र असणार आहेत.
२) स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांची इरठे डिमाण्ड ड्राफ्ट/ एनईएफटी/ आरटीजीएसद्वारा सादर करण्याचा मार्ग : **लाभाधिकारीचे नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, अकाऊन्ट नं. : ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.**
३) इरठेसमवेत बोली प्रपत्रे ऑनलाइन सादरीकरणाकरिता शेवटची तारीख **२८.०३.२०२४** आहे.
४) विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटला भेट द्यावी किंवा कृपया संपर्क साधावा : **श्री. मौलिक श्रीमाली, फोन : +९१-६३५१८९६६४३/ ९१७३५२८७२७,** हेल्प लाइन ई-मेल आयडी : **Support@auctiontiger.net**

**मोबाइल नं. : ८०९७५५५०७६/९७६४३३८८२२**
**दिनांक : २३.०२.२०२४**
**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
**निडो होम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)**

**रत्नागिरी नगरपरिषद, रत्नागिरी**

'रत्नागिरी नगरपरिषदेस पाणीपुरवठा करणेकामी शीळ धरणातील मृत पाणीसाठा पंपिंग यंत्रणेद्वारा उपसा करून शीळ नदीत सोडणे' या कामाची ई-निविदा **http://www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर दि. २२/०२/२०२४ ते दि. ०२/०३/२०२४ या कालावधीत उपलब्ध असेल.

सही/-
मुख्याधिकारी
रत्नागिरी नगरपरिषद, रत्नागिरी
दि. : २१/०२/२०२४

OMKARA **ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८. संपर्क क्र. : ९७७३४०६१७५.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**
[रुल ९(१) यासह वाचलेल्या ८ (६)च्या तरतुदी पाहा]

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको **मेसर्स आडगावकर सराफ प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापन अंतर्गत कंपनी), श्री. राम एस. आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार) व लव आडगावकर (सह-ऋणको) व कुश आडगावकर (ऋणको) व शाम शशिकांत आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार)** यांना सूचना देण्यात येते की, याखालील वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे आणि जिचा प्रत्यक्ष ताबा १०.०८.२०२३ रोजी ओमकारा एआरसी सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे. याखाली वर्णिलेल्या मालमत्तेची विक्री आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ. यासह एकत्रित संविदात्मक दरात निघालेले/ वसूल न झालेले व्याज अधिक **०४ जानेवारी, २०२० रोजीप्रमाणे रु. ८,४१,३३,०२५.३०/- (रुपये आठ कोटी एकेचाळीस लाख तेहतीस हजार पंचवीस व पैसे तीस फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता १२.०३.२०२४ रोजी स. ११.०० वा. ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.ने (ओमकारा पीएस ०४/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) ईसीएल फायनान्स लिमिटेडकडून अंतर्निहित सुरक्षेसह दिनांकित १५.०६.२०२० अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा उक्त ऋणको/ हमीदारांच्या अनुसार असलेले संपूर्ण थकीत ऋण प्राप्त केले आहेत.

त्यामुळे, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.ने ईसीएल फायनान्स लिमिटेडकडून कार्यभार हाती घेतला आहे आणि संपूर्ण थकीत देणींची वसुली आणि प्रतिभूतींवर अंमलबजावणी करण्यास हक्कदार बनली आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव आणि ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| कमर्शियल कॉम्प्लेक्स, स्टार झोन म्हणून नाव व स्टाइलमध्ये ज्ञात असलेली, उक्त कॉम्प्लेक्समधील व त्यापैकी बिल्डिंग ई-१ शॉप प्रीमायसेस धारण केलेला नं. १२, अप्पर ग्राऊण्ड फ्लोअर, कार्पेट एरिया मोजमापाचा २०१.६९ चौ.मी., मेझ्झानाइन प्लोअर, कार्पेट एरिया ८७.३१ चौ.मी., एकूण एरिया मोजमापाचा २८९.०० चौ.मी., पासपोर्ट ऑफिसजवळ, नाशिक-पुणे रोड, देवलाली शिवार, नाशिक रोड, नाशिक-४२२ ४०८. | रु. ५,१३,००,०००/- | रु. ५१,३०,०००/- |
| पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- बांधकाम केलेला फ्लॅट नं. ए-१०२, मोजमापाचा १६४५.०० चौ.फू. म्हणजेच १५२.८८ चौ.मी. बिल्ट-अप म्हणजेच ११७.५२ चौ.मी. कार्पेट एरिया समाविष्ट तीन बेड + हॉल + किचन + टॉयलेट, 'ए' विंगमधील पहिल्या मजल्यावरील, प्रियांका ब्लॉसोम अपार्टमेन्टमधील व त्यापैकी, जमीन मालमत्तेवर यथोचितरीत्या बांधकाम केलेले. सिरीन मिडोज, गंगापूर रोडलगत, नाशिक''. | रु. ६०,००,०००/- | रु. ६,००,०००/- |
| पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- बांधकाम केलेला फ्लॅट नं. ए-९०२, मोजमापाचा १६४५.०० चौ.फू. म्हणजेच १५२.८८ चौ.मी. बिल्ट-अप म्हणजेच ११७.५२ चौ.मी. कार्पेट एरिया समाविष्ट तीन बेड + हॉल + किचन + टॉयलेट, 'ए' विंगमधील पहिल्या मजल्यावरील, प्रियांका ब्लॉसोम अपार्टमेन्टमधील व त्यापैकी, जमीन मालमत्तेवर यथोचितरीत्या बांधकाम केलेले. सिरीन मिडोज, गंगापूर रोडलगत, नाशिक. | रु. ६०,००,०००/- | रु. ६,००,०००/- |

| | |
|---|---|
| **ई-लिलावाची तारीख** | १२.०३.२०२४ रोजी दु. ०१.०० वा ते दु. ०२.०० |
| **किमान बोलीवृद्धी रक्कम** | रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) |
| **सहभागाचे बोली पत्र/ केवायसी कागदपत्रे/ इरठेचा पुरावा इ. सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ** | ११.०३.२०२४ रोजी सायं ०६.०० वा.पर्यंत |
| **पाहणीची तारीख** | ०८.०३.२०२४ रोजी दु. ०१.०० व दु. ०४.०० दरम्यान |
| **ज्ञात दायित्वे** | ज्ञात नाहीत |

ही प्रसिद्धी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको/ गहाणकारांकरिता पंधरा दिवसीय नोटीससुद्धा आहे.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **http://omkaraarc.com/auction.php** या सुरक्षित धनकोंच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा आणि सविस्तर माहितीकरिता प्राधिकृत अधिकारीशी संपर्क साधावा : **प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्दे- ९३२४५४६६५१)** आणि ई-मेल : **pratiksha.patel@omkara.com** बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटलासुद्धा भेट देऊ शकतील किंवा सेवा-पुरवठाकार **मेसर्स सी-१ इंडिया प्रा. लि., टेलि. हेल्पलाइन : +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पंडया, मोबाइल : ८८६६६ ८२९३७, ई-मेल : Maharashtra@c1india.com** यांच्याशी संपर्क साधू शकतील. स्वारस्य असलेले बोलीदार इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्ट्सी कोड २०१६च्या सेक्शन २९ए अंतर्गत प्रतिज्ञापत्र देतील व अनुपालन करतील.

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत विक्रीकरिता सांविधिक सूचना**

ही सूचना सरफेसी ॲक्टच्या संबंधित तरतुदींनुसार विक्री बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळेत पुढील व्याज व सर्व किंमत, आकार व खर्च यासह एकत्रित यावर नमूद केल्यानुसार संपूर्ण थकीत देणींच्या प्रदानाद्वारा, मत्तेच्या विमोचनाकरिता, जर ते इच्छुक असल्यास, सल्ल्यासह वरील संदर्भित तारीख व वेळेत जाहीर लिलाव/ विक्रीच्या आयोजनाबाबत त्यांना कळविणारी, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या तरतुदी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत वरील कर्ज खात्याच्या ऋणकोंकरिता १५ दिवसीय (पंधरा) अनिवार्य सूचनासुद्धा आहे. जर प्रदानास कसूर झाल्यास, मालमत्ता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल, २००२च्या रुल ८(५) अंतर्गत विहित असल्यानुसार कोणत्याही प्रकारे विक्री करण्याबाबत प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनकोंच्या स्वेच्छाधिकारावर असणार आहे.

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,**
**ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
**दिनांक : २२.०२.२०२४**
**स्थळ : नाशिक (ओमकारा पीएस ०४/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)**



EXPRESS explained.Live
Uniform CIVIL Code
In conversation with
Prof. (Dr.) Faizan Mustafa
Vice-Chancellor
Chanakya National Law University, Patna
Apurva Vishwanath
Senior Assistant Editor
The Indian Express

Uttarakhand became the first state to pass a Uniform Civil Code, a common law on marriage, divorce, land and inheritance for all citizens.
With more states poised to enact similar laws, will India soon have UCC?
What does a UCC mean for tribals and minorities whose customs are protected?
How will it impact majority Hindu population which gets special tax benefits for Hindu Undivided Family?
Listen to Professor (Dr) Faizan Mustafa, Vice-Chancellor, Chanakya National Law University, Patna to know more.
26 February 2024 | 06:00 PM | Join us on ZOOM
To register, SMS - IEEXP <space> "IE" <space> "Your name and email ID" to 56161
Confirmation SMS will be your registration
Associate Partner PLUTUS IAS UPSC/PCS
The Indian EXPRESS — JOURNALISM OF COURAGE
IndianExpress.com/apps | twitter.com/IndianExpress | facebook.com/IndianExpress